# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४९८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१२/०८/२०१६.

**१) घरातील सोन्याच्या दागीन्याची चोरी . :—**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी १२.३० वा. दर. यातील फिर्यादी श्रीमती रेखा सोविंदा गोमासे वय ४० वर्ष रा. गुंथारा हि आपल्या घराला ताला लावुन शेतात रोवना करण्यास गेली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे बंद घराचे स्लॅप वर जावुन धाब्यावरून घरात प्रवेश करून आलमारीत वेगवेगळया डब्यात ठेवलेली १ सोन्याची अंगठी ०४ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, सोन्याचे कानातील टॉप ०३ ग्रॅम, असा एकुण १० ग्रॅम सोना एकुण कि. २६,०००/—रू. चा माल चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४५४,३८०भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकलने महीलेच्या गळयातील मंगळसुत्र जबरीने हिसकावुन नेला. :—**

दिनांक ११/०८/२०१६ रोजी १७.३० ते १७.४५ वा. दर. यातील फिर्यादी सौ. कमलाबाई महादेव कावळे वय ६७ वर्ष रा. खात रोड भंडारा ही म्हाडा कॉलोनीतील म्हाडा कॉम्पलेक्स कडे पायी जात असता तिचे मागेहुन लाल रंगाची मोटार सायकलने येणा—या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादीचे गळयातील खिचडीपांत ज्यात सोन्याचे ६० पिटीव मनी, २ सोन्याचे डोरले १० ग्रॅम, एकुण किंमत २०,०००/—रु. चा माल जबरीने हिसकावुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३९२,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. गायकवाड पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) काठीने मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/०८/२०१६ रोजी २३.०० वा. दर. यातील फिर्यादी सोनु देविदास कानेकर वय २१ वर्ष रा. तुमसर हा आरोपीतांचे घराकडे आपले भावाची मोटार सायकल आनण्यास जात असतानां यातील आरोपीतांनी जुन्या वादावरुन संगणमत व भांडण करून फिर्यादीचे डोक्यावर आरोपी क्र. १ ने काठीने मारुन जखमी केल्याने फिर्यादीचे बयान व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४,३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) अवैध दारू अडयांवर धाडी. :—**

दिनांक १२/०८/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. सिहोरा व आंधळगांव येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू एकुण कि. १,७५०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

( श्री.एस. घुसर)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह) भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५६१९९९१

प्रती,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.